श्रीमद्भगवद्गीतेच्या 8 व्या अध्यायाचे नाव अक्षरब्रह्म योग असे असून त्यामध्ये 28 श्लोक आहेत.

अर्जुन उवाच

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम। अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते।।8.1।।

अर्जुन उवाच - हे पुरुषोत्तम! तत् ब्रह्म किम् ? अध्यात्मम् किम् ? कर्म किम् ? अधिभूतम् किम् प्रोक्तम् ? अधिदैवम् च किम् उच्यते ?

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन |

प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभि: || 8.2||

हे मधुसूदन! अत्र अस्मिन् देहे अधियज्ञः कः कथम् ? कथम् च नियत-आत्मभिः प्रयाण-काले ज्ञेयः असि ?

अर्जुन उवाच -

हे पुरुषोत्तम!

तत् तद् नपु. प्र. ए. व.

ब्रह्म ब्रह्मन् नपु. प्र. ए. व.

किम् ? किम् नपु. प्र. ए. व.

अध्यात्मम् अधि+आत्मम् नपु. प्र. ए. व.

किम् ? किम् नपु. प्र. ए. व.

कर्म कर्मन् नपु. प्र. ए. व.

किम् किम् नपु. प्र. ए. व.

अधिभूतम् अधि+भूत नपु. प्र. ए. व.

किम् किम् नपु. प्र. ए. व.

प्रोक्तम् प्र+वच् धातु क्त प्रत्यय नपु. प्र. ए. व.

अधिदैवम् अधि+दैव नपु. प्र. ए. व.

च सुद्धा अव्यय

किम् किम् नपु. प्र. ए. व.

उच्यते वच् धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ए. व.

हे मधुसूदन!

अत्र येथे अव्यय

अस्मिन् ह्या इदम् पु. स. ए. व.

देहे शरीरात देह नपु. स. ए. व.

अधियज्ञः अधि+यज्ञ पु. प्र. ए. व.

कः कोण किम् पु. प्र. ए. व.

कथम् कसे अव्यय

कथम् कसे अव्यय

च सुद्धा अव्यय

नियत-आत्मभिः नियत-आत्मन् संयमी पुरुषांनी पु. तृ. ब. व. प्रयाण-काले मृत्यू समयी प्रयाण-काले पु. स. ए. व.

ज्ञेयः जाणावे ज्ञा धातु यत् प्रत्यय पु. प्र. ए. व.

असि हो अस् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद म. पु. ए. व.

अधिभूत अधिदैव ह्या दोन शब्दांचे सूतोवाच स्वतः श्रीभगवानकृष्णांनी आधीच्या अध्यायातील शेवटच्या श्लोकात केले होते. तोच धागा पकडून अर्जुन श्रीभगवानकृष्णांना ह्या अध्यायातील पहिल्या दोन श्लोकात एकूण सात प्रश्न विचारत आहे.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

हे पुरुषोत्तम! ते ब्रह्म काय आहे? अध्यात्म म्हणजे काय? कर्म म्हणजे काय समजायचे? अधिभूत कशाला म्हणतात? अधिदैव ते काय?

हे मधुसूदन! (मधु राक्षसाला मारणारा) ह्या शरीरात अधियज्ञ आहे तो कोण आहे? आणि कसा? आणि संयमी पुरुषांनी अंतिम समयी तुला कसे ओळखावे?

श्री भगवानुवाच

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते। भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः।।8.3।।

श्रीभगवानुवाच - परमम् अक्षरम् ब्रह्म, स्वभावः अध्यात्मम् उच्यते, भूत-भाव-उद्भव-करः विसर्गः कर्म-संज्ञितः।।

श्रीभगवानुवाच -

परमम् श्रेष्ठ परम नपु. प्र. ए. व.

अक्षरम् अविनाशी अ+क्षर धातु वाहणे नपु. प्र. ए. व.

ब्रह्म ब्रह्मन् नपु. प्र. ए. व.

स्वभावः स्वभाव पु. प्र. ए. व.

अध्यात्मम् अध्यात्म अधि+आत्मम् नपु. प्र. ए. व.

उच्यते म्हणतात वच् धातु लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ए. व.

भूत-भाव-उद्भव-करः भौतिक जग निर्माण करणारा भूत-भाव-उद्भव-कर पु. प्र. ए. व.

विसर्गः त्याग विसर्ग पु. प्र. ए. व.

वि+सर्ग पु. प्र. ए. व. सृज् धातु सोडणे

कर्म-संज्ञितः सकाम कर्म जाणतात कर्मन्-संज्ञित पु. प्र. ए. व.

सम+ज्ञा धातु जाणणे

आधीच्या दोन श्लोकात अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आता श्रीभगवानकृष्णांनी द्यायला सुरुवात केली आहे. ब्रह्म, अध्यात्म आणि कर्म याबद्दल ते आता बोलत आहेत.

अखण्डं सच्चिदानन्दमवाङ्मनसगोचरम् आत्मानमखिलाधारमाश्रयेऽभिष्टसिद्धये। वेदान्तसार 1।।

सर्वव्यापी असा सत् चित् आनंद ब्रह्म आपल्या इन्द्रियांद्वारे बघता येत नाही पण फक्त त्याची अनुभूती घेता येते.

मंगलाचरण म्हणून हा मंत्र बरेचदा वाचायला मिळतो.

स होवाच, एतद्वै तदक्शरः, गार्गि ब्राह्मणा अभिवदन्ति,
अस्थूलमनण्वह्रस्वमदीर्घमलोहितमस्नेहमच्छायमतमोऽ-

वाय्वनाकाशमसङ्गमचक्शुष्कमश्रोत्रमवागमनोऽ-

तेजस्कमप्राणममुखममात्रमनन्तरमबाह्यम्, न तदश्नाति किंचन, न तदश्नाति कश्चन ॥बृहद-आरण्यक 3.8.8॥

याज्ञवल्क्य ऋषी गार्गी ला म्हणतात ब्रह्म जाणणारे असे म्हणतात की हा अपरिवर्तनीय ब्रह्म तोच आहे जो स्थूल नाही, सूक्ष्म नाही, मोठा नाही छोटा नाही, लाल नाही चिकट नाही सावली नाही अंधकार नाही वायु नाही आकाश नाही, निरस आहे, गंध नाही नेत्र, कान, वाणी, मन सुद्धा नाही. ज्योती नाही प्राण नाही, मुख नाही, मात्रा नाही, आत नाही बाहेर सुद्धा नाही, हा काही खात नाही आणि ह्याला सुद्धा कोणी खात नाही.

थोडक्यात ब्रह्म पेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. येथे अक्षर चा अर्थ कधीच न संपणारा. जरी ॐ हे अक्षर ब्रह्माच्या मुखातून बाहेर पडले असले तरी.

'स्वो भावः स्वभावः' अर्थात जीवमात्राचे अस्तित्व म्हणजे अध्यात्म. अध्यात्म म्हणजे स्वभाव, स्वयंसिद्धता. आपल्या शरीराचे अस्तित्व दाखवता येते त्याला नियंत्रण करणारी स्वयंभू सत्ता म्हणजे अध्यात्म. प्रत्येक व्यक्तिमधे सत्तारूपी असणारे श्रेष्ठ तत्व, परब्रह्मच असते.

हया भौतिक जगात आत्मा 84 लक्ष प्रकारे आपले अस्तित्व दाखवून देतो. ही जीवसृष्टी टिकवून ठेवणे, जगाचा व्यवहार सुरळीत चालू ठेवणे हाच एक यज्ञ आहे. त्यामधे आहुती पडणारच आणि त्याची फलनिष्पत्ती म्हणजे जीवात्मा जो आपल्या कर्माप्रमाणे सक्रिय होतो.

हया श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

श्रीभगवान म्हणाले अविनाशी श्रेष्ठ असा तो ब्रह्म, त्याच्या नित्य स्वभावाला अध्यात्म असे म्हणतात आणि जीवांच्या उत्पत्तीस कारणीभूत असणाऱ्या कार्यांना कर्म असे म्हणतात.

अधिभूतं क्षरो भवः पुरुषश्चाधिदैवतम्। अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वरः।8.4।।

हे देह-भृताम् वर! क्षरः भावः अधिभूतम्, पुरुषः अधिदैवतम्, अत्र देहे च अहम् एव अधियज्ञः।

हे देह-भृताम् हे श्रेष्ठ देहधारी देह-भृत पु. तृ. ब. व.

वर! वर पु. संबोधन

क्षरः वाहून जाणारा क्षर पु. प्र. ए. व.

भावः प्रकृति भाव पु. प्र. ए. व.

अधिभूतम् भौतिक अभिव्यक्ती अधिभूत नपु. प्र. ए. व.

पुरुषः पुरुष पु. प्र. ए. व.

अधिदैवतम् देवांचा श्रेष्ठ अधिदैव नपु. प्र. ए. व.

अत्र येथे अव्यय

देहे शरीरात देह नपु. स. ए. व.

च सुद्धा अव्यय

अहम् मी अस्मद् प्र. ए. व.

एव नक्की अव्यय

अधियज्ञः परमात्मा अधियज्ञ पु. प्र. ए. व.

7व्या अध्यायातील 4 थ्या आणि 5 व्या श्लोकात सजीव सृष्टीचे विस्तृत वर्णन आपण वाचले. पृथ्वी जल तेज वायु आणि आकाश या पञ्चमहाभूतांनी तयार झालेल्या क्षणोक्षणी परिवर्तनशील आणि नाशवंत सृष्टिला अधिभूत असे म्हणतात. आपापल्या कर्माप्रमाणे आपला जन्म होतो आणि स्वकर्मानेच कर्मफळाची प्राप्ती सुद्धा होते.

भूतांतें अधिकरूनि असे । आणि भूतसंयोगें तरी दिसे जें वियोगवेळे भ्रंशें । नामरूपादिक ॥ 8.32 ॥

तयातें अधिभूत म्हणिजे । मग अधिदैव पुरुष जाणिजे । जेणें प्रकृतीचें भोगिजे । उपार्जिलें ॥ 8.33 ॥

पंचमहाभूतांचा आश्रय करून आणि त्यांच्या संयोगातून जे दिसते, आणि पंचमहाभूतांचा वियोग झाला असता जे नाश पावते त्याचे नाव शरीर ॥8.32॥

त्या शरीराला अधिभूत म्हणावे. मग अधिदैव म्हणजे पुरुष समजावा जो प्रकृतीने मिळवलेले भोग भोगतो ॥8.33॥

अशाच अर्थाचा श्लोक श्रीमद्भगवद्गीतेच्या पुढील अध्यायात सापडतो.

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान्। कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु।।13.22।।

प्रकृति मध्ये स्थित असणारा पुरुष प्रकृति च्या गुणांचा उपभोग घेतो. ह्या गुणांमुळेच पुरुष (जीव) निरनिराळे जन्म घेतो.

नऊ द्वारांच्या पुरात राहणारा तो पुरुष म्हणजे चैतन्यशक्ती. म्हणून तो अधिदैवत.

देहामधे असलेला अहंकार आणि मायाशक्तीचा प्रभाव दूर करून ब्रह्मप्राप्ती साठी कार्य करायचे तो एक यज्ञच.

शतपथ-ब्राह्मण 13.1.8.8 ह्या श्लोकात श्री भगवान विष्णुंचे वर्णन केले आहे.

यज्ञो वै विष्णुः यो यजति विद्वभिर्यते वा स यज्ञः' यज्ञ हाच विष्णुस्वरूप आहे.

श्रीमद्भगवद्गीतेच्या 3 ऱ्या अध्यायातील 9 व्या श्लोकात यज्ञाचे वर्णन वाचायला मिळते.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की

हे देहधारी मधील श्रेष्ठ!

क्षरभाव असणाऱ्या नाशवंत गोष्टींना अधिभूत म्हणतात. पुरूष अधिदेव आहे आणि ह्या शरीरात मीच अधियज्ञ आहे.

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्। यः प्रयति स मदभावं याति नास्त्यत्र संशयः।।8.5।।

अन्त-काले यः माम् एव स्मरन् कलेवरम् मुक्त्वा च प्रयाति, सः मत् भावम् याति, अत्र संशयः न अस्ति।

अन्त-काले अंतिम समयी अन्त-काल पु. स. ए. व.

यः जो यद् पु. प्र. ए. व.

माम् एव माझे च

अस्मद् द्वि. ए. व.

एव नक्की अव्यय

स्मरन् स्मरण करताना स्मृ धातु शतृ प्रत्यय पु. प्र. ए. व.

कलेवरम् नश्वर देह कलेवर पु. द्वि. ए. व.

मुक्त्वा त्यागून मुच् धातु क्त्वा प्रत्यय

च सुद्धा अव्यय

प्रयाति, प्रयाण करतो प्र+या धातु जाणे कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

सः तो तद् पु. प्र. ए. व.

मत् माझा अस्मद् द्वि. ए. व.

भावम् भाव पु. द्वि. ए. व.

याति जातो या धातु जाणे कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

अत्र येथे अव्यय

संशयः संशय पु. प्र. ए. व.

न अव्यय

अस्ति आहे अस् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

हया श्लोकात श्रीभगवानकृष्ण अर्जुनाच्या शेवटच्या प्रश्नाचे उत्तर देत आहेत.

येथे लिहीलेल्या कलेवर शब्दाचा अर्थ समजून घेतला की श्लोकाचा अर्थ सहज समजतो.

वर म्हणजे नक्की करणे

वृ धातु शोधणे

स्वयंवरात वधू वराला नक्की करते. नरवर म्हणजे नरांमधला श्रेष्ठ.

कल म्हणजे ओढा, प्रवृत्ती. कलाकार शब्द याचमुळे तयार झाला. म्हणून कलेवर हया शब्दाचा अर्थ फक्त देह असा नाही तर त्यामधे असणारे अंगभूत गुण.

स्मरन् हया शब्दाचा अर्थ फक्त आठवणे इतका मर्यादित नसून तो विषय अंगिकारणे असा घ्यायला हवा. जी गोष्ट माहीत आहे त्याचेच स्मरण करणे शक्य आहे. म्हणजेच उभ्या हयातीत परमेश्वराचा अनुभव अशा व्यक्तीला झाला आहे.

ॐ क्रतो स्मर कृतं स्मर क्रतो स्मर कृतं स्मर। ईशावास्योपनिषद 17।।बृहद-आरण्यक 5.1।।

हे दिव्य संकल्पशक्ति! स्मरण कर, जे कर्म केले आहे त्याचे स्मरण कर!

थोडक्यात आपण आयुष्यभर असे काम केले पाहिजे ज्याचे स्मरण अंतिम समयी केले असता परमेश्वर प्राप्ती होईल.

यावरून महान व्यक्तींच्या शेवटच्या शब्दांची आठवण झाली. जसे येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध, महात्मा गांधी वगैरे.

हया श्लोकाचा असा सुद्धा अर्थ घेता येईल की जर तुम्हाला पश्चात्ताप झाला असेल किंवा तुम्ही पूर्ण शरणागती पत्करली असेल तर तुम्हाला परमेश्वराच प्राप्ती होईल.

हया श्लोकात श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे म्हणतात की

जो पुरुष अंतिम समयी शरीर त्यागते वेळी माझाच विचार करत असतात ते माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतात यात काही शंकाच नाही.

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम्। तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः।।8.6।।

हे कौन्तेय! अन्ते यम् यम् वा अपि भावम् स्मरन् कलेवरम् त्यजति; सदा तद्त् भाव-भावितः तम् तम् एव एति।

हे कौन्तेय! हे कुंती-पुत्र

अन्ते अंतिम समयी अन्त पु. स. ए. व.

यम् यम् ज्या ज्या यद् पु. द्वि. ए. व.

वा अथवा अव्यय

अपि सुद्धा अव्यय

भावम् भावनांचे भाव पु. द्वि. ए. व.

स्मरन् आठवण काढत स्मृ धातु शतृ प्रत्यय पु. प्र. ए. व.

कलेवरम् शरीर कलेवर पु. द्वि. ए. व.

त्यजति त्यागतो त्यज् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

सदा नेहमी अव्यय

तत् भाव-भावितः त्याच विचारांचा भाव

तद्-भाव-भावित पु. प्र. ए. व.

तम् तम् त्या त्या तद् पु. द्वि. ए. व.

एव नक्की अव्यय

एति प्राप्त होतो इ धातु जाणे कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

वरवर पाहता असे वाटते की आपण आयुष्यभर कसेही वागावे आणि शेवटी आपल्याला जसा पुढील जन्म हवा आहे त्याचे चिंतन करावे म्हणजे त्याप्रमाणे घडेल असा हया श्लोकाचा अर्थ आहे की काय? पण त्यापेक्षा अधिक हया श्लोकात सांगायचे आहे. आपल्याला जडभरताच्या हरीण रूपातील पुनर्जन्माची गोष्ट माहीत आहे. आपण जे आयुष्य जगतो तीच आपली प्रवृत्ती बनते. प्रयत्नपूर्वक आपण आपल्या वृत्ती बदलू शकतो. आपल्या मनात सतत कोणते ना कोणते विचार येत असतात. आपल्याला आपल्या मनाच्या स्थितीचा निरनिराळ्या मथळ्याखाली स्वतःच अभ्यास करून जाणून घेता येईल . जसे राग तिरस्कार आसूया लोभ असे विचार मनात येतात की ममत्व, आपुलकी, माया, आनंद वगैरे. सर्व वासनांचा लोप पावणे म्हणजेच मोक्ष. फक्त शरीराचा आपण त्याग करायचा नाही तर आपल्यातील दुर्गुणांचा सुद्धा त्याग करायचा आहे. आपल्याला सात्विक गुण आधी आत्मसात करून नंतर समता आणि त्याच्या पलीकडे विरक्ती कडे जायचे आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन।

यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ॥ मुण्डकोपनिषद् 3.2.3।।

हा आत्मा प्रवचने, मेधाशक्ती च्या साहयाने किंवा बहुश्रुत असल्याने प्राप्त होत नाही. जो त्याला प्राप्त करण्याची इच्छा धरतो त्यालाच त्याची प्राप्ती होते. त्यालाच आत्मा आपलें सत्य स्वरूप प्रकट करतो.

तेविं जितेनि अवसरें । जें आवडोनि जीवीं उरे । तेंचि मरणाचिये मेरे । फार हों लागे ॥ ज्ञानेश्वरी 8.74 ॥

आणि मरणीं जया जें आठवे । तो तेचि गतीतें पावे, म्हणौनि सदा स्मरावें । मातेंचि तुवां ॥ ज्ञानेश्वरी 8.75॥

याप्रमाणे जिवंत असतांना, जी गोष्ट आवडीने अंत:करणात रहाते, तीच मरणाचे वेळी वारंवार मनात येते. ॥8.74॥

आणि मरणसमयी ज्यास जी वस्तु आठवते त्याच गतीला तो जातो, असे आहे म्हणूण तू नेहेमी माझेच स्मरण कर. ॥8.75॥

हया श्लोकात श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे म्हणतात की

हे कौन्तेय! शरीर त्याग करते वेळी आपल्या मनात जे जे भाव असतात, त्याचे आपल्याला स्मरण होत असते तेच भाव पुढील जन्मात प्रतित होतात.

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च। मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम्।।8.7।।

तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर, युध्य च मयि अर्पित-मनः-बुद्धिः। असंशयम् माम् एव एष्यसि।

तस्मात् म्हणून तद् पु. पं. ए.व.

सर्वेषु सर्व पु. स. ब. व.

कालेषु काळ काल पु. स. ब. व.

माम् मला अस्मद् द्वि. ए. व.

अनुस्मर स्मरण कर अनु+स्मृ धातु कर्तरि लोट् लकारः परस्मै पदम् म. पु. ए. व.

युध्य युद्ध कर युध् धातु कर्तरि लोट् लकारः परस्मै पदम् म. पु. ए. व.

च सुद्धा अव्यय

मयि माझ्यात अस्मद् स. ए. व.

अर्पित-मनः-बुद्धिः मन बुद्धी अर्पण करून अर्पित-मनस् बुद्धि स्त्री. प्र. ए. व.

असंशयम् निःसंशय असंशय पु. द्वि. ए. व.

माम् मला अस्मद् द्वि. ए. व.

एव नक्की अव्यय

एष्यसि प्राप्त होईल इ धातु कर्तरि लृट लकार परस्मैपद म. पु. ए. व.

ह्या श्लोकात युध्य असे परस्मैपदाचे रूप वापरले आहे. त्याचा अर्थ त्याप्रमाणे वाचायला हवा. कर्मयोगाचा एक महत्त्वाचा पाठ ह्या श्लोकात वाचायला मिळतो. सर्वसाधारणपणे आपण काम सुरू करण्यापूर्वी परमेश्वराचे स्मरण करून कामाला सुरुवात करतो. काहीजण काम करता करता वेळ मिळेल तसे ईश्वराचे स्मरण करतात. येथे श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला सर्व काळ माझे स्मरण कर आणि युद्ध करण्याचे कर्तव्य पार पाड असे सांगत आहेत. ईश्वराशी इतकी एकरूपता निर्माण झाली आहे हे सांगताना कबीर असे म्हणतात की

सुमिरन की सुधि यों करो, ज्यौं गागर पनिहार। बोलत डोलत सुरति में, कहे कबीर विचार ।।

पाण्याने भरलेली मटकी आपल्या डोक्यावर घेऊन इतक्या सहजपणे महिला वावरत असते जणू काही ती मटकी तिच्या शरीराचाच भाग आहे. आधीच्या श्लोकाचा संदर्भ घेऊन जर ह्या श्लोकाचा अर्थ लावायचा प्रयत्न केला तर असे म्हणता येईल की आपल्याला आपल्या मृत्यूची वेळ माहीत नसते, त्यामुळे परमेश्वराशी एकरूप व्हायचे असेल तर सतत त्याचे स्मरण करणे आवश्यक आहे. परमेश्वराशी जोडून घ्यायचे म्हणजे नक्की काय करायचे?

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः भद्रं पश्येमक्षभिर्यजत्राः स्थिरैरङ्गास्तुस्तुवासस्तनूभिः व्यशेम देवहितं यदायुः।।

शांतिमंत्रात असे सांगितले आहे कि फक्त कल्याणकारी गोष्टी पहाव्या, ऐकाव्या आणि आयुष्यभर आपण परमेश्वराची स्तुती करावी.

ह्या श्लोकाच्या दुसऱ्या ओळीत मन आणि बुद्धी अर्पण करावयास सांगितले आहे,म्हणजे काय? आपली बुद्धी स्थिर ठेवून, परमेश्वरावर नितांत श्रद्धा ठेवून आपले काम करायचे.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

म्हणूनच तू माझ्या मध्ये मन आणि बुद्धी समर्पित करून माझे नित्य स्मरण कर, युद्ध कर. तू निःसंदेह मला प्राप्त होशील.

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना। परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्।।8.8।।

हे पार्थ! अभ्यास-योग-युक्तेन न अन्य-गामिना चेतसा अनुचिन्तयन्, परमम् दिव्यम् पुरुषम् याति ।

हे पार्थ! अभ्यास-योग-युक्तेन योग च्या अभ्यासाने युक्त अभ्यास-योग-युक्त युज् धातु क्त प्रत्यय पु. तृ. ए. व.

न अव्यय

अन्य-गामिना इतरत्र मन विचलित न होता अन्य-गामिन् पु. तृ. ए. व.

चेतसा मनाने चेतस् नपु. तृ. ए. व.

अनुचिन्तयन् निरंतर चिंतन करून अनु+चिन्त् धातु शतृ प्रत्यय पु. प्र. ए. व.

परमम् श्रेष्ठ परम नपु. द्वि. ए. व.

दिव्यम् दिव्य पु. द्वि. ए. व.

पुरुषम् पुरुष पु. द्वि. ए. व.

याति प्राप्त होतो या धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

अभ्यास = अभि+ आ+अस् धातु + घञ् प्रत्यय हया शब्दाचा खरा अर्थ व्यासंग असाच आहे. येथे अभ्यासाचा विषय काय आहे? तर परमात्म्याची प्राप्ती. आधीच्या श्लोकात मन आणि बुद्धी अर्पण करून परमेश्वराचे स्मरण करण्यास सांगितले होते. परमेश्वराची प्राप्ती ही सोपी गोष्ट नव्हे, त्यासाठी परीश्रम हवेच.

असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।। ' तुकाराम गाथा, अभंग २९८, ओवी ३।।

तेषां सततयुक्तानां बुद्धियोगं ददामि 10.10।।

नित्य प्रयत्न करणाऱ्यास मी बुद्धिरूपी उपाय देतो.

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशयः। 12.8।।

माझ्या ठिकाणी मन आणि बुद्धी दृढ कर.

अभ्यासाचे महत्त्व मुण्डकोपनिषद् मध्ये पुन्हा पुन्हा सांगितले आहेच.

असे निश्चयपूर्वक पुढे जात राहिले की सुरवंटाचे फुलपाखरू व्हायला वेळ लागणार नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, तेविं चित्ताचें चैतन्य जाहालें ।ज्ञानेश्वरी 8.85।।

हया श्लोकात तीन महत्त्वाचे मुद्दे सांगितले आहेत.

योगाचा अभ्यास

निरंतर परीश्रम आणि लक्ष्य प्राप्ती

हया श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की

हे पार्थ! इतरत्र मन विचलित होऊ न देता अभ्यासयोगाने निरंतर चिंतन केल्यास दिव्य श्रेष्ठ पुरुषाची प्राप्ती होते.

कविं पुराणमनुशासितार मणोरणीयांसमनुस्मरेद्यः। सर्वस्य धातारमचिन्त्यरूप

मादित्यवर्णं तमसः परस्तात्।।8.9।।

यः कविम्, पुराणम्, अनुशासितारम्, अणोः अणीयांसम्, सर्वस्य धातारम्, अचिन्त्य-रूपं, तमसः परस्तात् आदित्य-वर्णम् अनुस्मरेत्।

यः जो यद् पु. प्र. ए. व.

कविम् द्रष्टा कवि पु. द्वि. ए. व.

पुराणम् अनादी पुराण पु. द्वि. ए. व.

अनुशासितारम् नियंत्रक अनु+शास् धातु तृच् प्रत्यय पु. द्वि. ए. व.

अणोः अणीयांसम् सूक्ष्माहून सूक्ष्म

अणु पु. ष. ए. व.

अणीयांसम् अणीयस् पु. द्वि. ए. व.

सर्वस्य सर्व पु. ष. ए. व.

धातारम् धारण करणारा धातृ पु. द्वि. ए. व.

अचिन्त्य-रूपम् विचार करता येणार नाही असा अचिन्त्य-रूप पु. द्वि. ए. व.

तमसः परस्तात् अज्ञानाच्या पलिकडे

तमस् नपु. पं. ए. व.

परस्तात् अव्यय

आदित्य-वर्णम् सूर्यासारखा तेजस्वी आदित्य-वर्ण पु. द्वि. ए. व.

अनुस्मरेत् स्मरण करतो अनु+स्मृ धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ए. व.

आधीच्या श्लोकात अभ्यासयोगाने श्रेष्ठ पुरुषाची प्राप्ती होते असे म्हटले होते त्याच्या 8 गुणांचीओळख हया श्लोकात करून दिली आहे. निरनिराळ्या श्रुतींमधे त्याचे वर्णन केले आहे.

हया श्लोकातील कवि या शब्दाचा अर्थ द्रष्टा. 7व्या अध्यायातील 26 व्या श्लोकात तो म्हणजे श्रीभगवानकृष्ण भूत वर्तमान आणि भविष्य जाणतात असे म्हटले होते. कवि सर्वज्ञ आहे, अंतिम सत्य जाणणारा आहे. त्रिकालाचे ज्ञान त्याला आहे.तो अनादिसिद्ध सनातन आहे. तो सर्वांचाच आदि आहे. असे म्हणतात की त्याच्या मर्जीशिवाय झाडाचे पान सुद्धा हलू शकत नाही. सर्व कर्मांच्या मागे त्याची सत्ता आहे, तोच स्फूर्ती आहे तोच नियामक आहे. शास्ता आहे. अथर्वशीर्षात त्याचे यथार्थ वर्णन केले आहे.

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते ।

सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति ।

सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति । सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ।

हया जगाला धारण करणारा, निर्माण करणारा आणि विनाश करणाराही तूच आहेस.

तो अणू पेक्षाही लहान आणि ब्रह्मांडापेक्षाही मोठा आहेस. अणोरणीयानमहतो महियान्। कठोपनिषद् 1.2.20 मधे त्याचे असे वर्णन केले आहे.

सर्वांना धारण करणारा असा तू आदित्यवर्ण म्हणजे दिव्य तेज युक्त असा आहे.

मन आणि बुद्धी च्या पलिकडे असणारा तू अचिन्त्यरूप असा आहेस.

श्रुतींमधे अज्ञानाची बरेचदा अंधाराशी तुलना केलेली सापडते. म्हणून त्याचे 'तमसः परस्तात्' असे वर्णन केले आहे. यस्मात्क्षरमतीतोऽहम श्रीमद्भगवद्गीता 15.18 मी क्षर आणि अक्षर हया दोन्हीच्या पलिकडे आहे. सामान्य माणूस प्रकृती आणि मायापाशात अडकलेली असतो आणि म्हणून तो अज्ञानी.

हया श्लोकात श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे म्हणतात की

द्रष्टा, अनादी, नियंता, सूक्ष्माहून सूक्ष्म, सर्वांचे धारण पोषण करणारा, अचिन्त्य, सूर्याप्रमाणे तेजस्वी, जो अज्ञानाच्या पलिकडे आहे अशा पुरुषाचे जो चिंतन करतो, तो त्या पुरुषाला प्राप्त होतो.

प्रयाणकाले मनसाऽचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव। भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम्।।8.10।।

भक्त्या युक्तः सः प्रयाण-काले योग-बलेन भ्रुवोः मध्ये प्राणम् सम्यक् आवेश्य, अचलेन मनसा, च तम् दिव्यम् परम् पुरुषम् एव उपैति।

भक्त्या भक्तीने भक्ति स्त्री. तृ. ए. व.

युक्तः युक्त युज् धातू क्त प्रत्यय पु. प्र. ए. व.

सः तो तद् पु. प्र. ए. व.

प्रयाण-काले अंतिम समयी प्रयाण-काल पु. स. ए. व.

योग-बलेन योगशक्तीने योग-बल नपु. तृ. ए. व.

भ्रुवोः भुवयांच्या भ्रू स्त्री. ष. द्वि. व.

मध्ये मध्य पु. स. ए. व.

प्राणम् प्राणाला प्राण पु. द्वि. ए. व.

सम्यक् चांगले अव्यय

आवेश्य स्थापित करून आङ्ः +विश् धातु ल्यप प्रत्यय

अचलेन निश्चल अचल नपु. तृ. ए. व.

मनसा मनाने मनस् नपु. तृ. ए. व.

च सुद्धा अव्यय

तम् ते तद् पु. द्वि. ए. व.

दिव्यम् दिव्य पु. द्वि. ए. व.

परम् श्रेष्ठ पर पु. द्वि. ए. व.

पुरुषम् पुरुष पु. द्वि. ए. व.

एव नक्की अव्यय

उपैति प्राप्त होतो उप+इ धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

दोन भुवयांच्या मध्ये आज्ञाचक्र आहे असे सांगितले जाते. चंचल, विचलित मन योगाभ्यास करून एकाग्र होऊ शकते, त्याची प्रक्रिया ह्या श्लोकात सांगितली आहे असे वाटते. 6व्या अध्यायातील 19 व्या श्लोकात स्थिर मनाला कंपनरहीत ज्योतीची उपमा दिली होती. खरे तर आपल्याला आपला मृत्यू कधी होणार ते निश्चित सांगता येत नाही, त्यामुळे ह्या श्लोकाच्या अर्थानुसार प्रत्यक्षात ते कसे घडू शकेल ते सांगता येत नाही. पण शक्य असेल तेव्हा योगाभ्यास करत रहावे असे सुद्धा म्हणता येईल. परमेश्वराचे स्मरण करत राहिले असता साधकाला आपल्या वृद्धत्वाचा, त्यामुळे होणाऱ्या त्रासाचा विसर पडतो असे आपण आधीच्या अध्यायात वाचले आहे. ह्या श्लोकाचा असा सुद्धा अर्थ होऊ शकतो की आत्मज्ञान झाल्याशिवाय केवळ कर्मयोगाने ब्रह्मप्राप्ती होऊ शकत नाही. पण आपल्या विवेचनाचा हा मुद्दा नाही.

संत ज्ञानेश्वरांनी 91-99व्या ओवींमधे फार चांगल्या पद्धतीने ह्या श्लोकाचे निरूपण केले आहे. ह्या श्लोकाचा पूर्ण अर्थ समजून घेण्यासाठी अष्टांग योगाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय तत्त्वज्ञानानुसार पाच प्रकारचे प्राण आपल्या शरीरात कार्यरत असतात त्यांची नावे पुढिल प्रमाणे

पंचप्राण- प्राण हृदयात, अपान गुदस्थानात, समान नाभिमण्डलात, उदान कंठात आणि व्यान संपूर्ण शरीरात. योगाभ्यास करण्यापूर्वी आठ नियमांचे पालन आवश्यक असते. ज्यायोगे व्यक्ती अहंकार रहीत वृत्तीने परमेश्वराला जोडून घेण्यास सिद्ध होते.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

तो भक्तीमय व्यक्ती अंतकाळी अविचल मनाने योग शक्तीच्या साहयाने आपल्या दोन भुवयांच्या मध्ये प्राण स्थापन करून त्या दिव्य श्रेष्ठ पुरुषाला प्राप्त करून घेतो.

यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागाः। यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति

तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये।।8.11।।

वेद-विदः यत् अक्षरम् वदन्ति, वीत-रागाः यतयः यत् विशन्ति, यत् इच्छन्तः ब्रह्मचर्यम् चरन्ति, तत् पदम् ते संग्रहेण प्रवक्ष्ये।

वेद-विदः वेद जाणणारा वेद-विदः पु. प्र. ब. व.

यत् जे यद् नपु. द्वि. ए. व.

अक्षरम् अविनाशी अक्षर नपु. द्वि. ए. व.

वदन्ति सांगतात वद् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

वीत-रागाः आसक्ती रहीत वीत-राग पु. प्र. ब. व.

यतयः महान तपस्वी यति पु. प्र. ब. व.

यत् ते यद् नपु. द्वि. ए. व.

विशन्ति प्रवेश करतात विश् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

यत् जे यद् नपु. द्वि. ए. व.

इच्छन्तः इच्छा करतात इष् धातु शतृ प्रत्यय पु. प्र. ब. व.

ब्रह्मचर्यम् ब्रह्मचर्य नपु. द्वि . ए. व.

चरन्ति आचरण करतात चर् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

तत् ते तद् नपु. द्वि. ए. व.

पदम् लक्ष्य पद नपु. द्वि. ए. व.

ते तुला युष्मद् च. ए. व.

संग्रहेण सारांशाने संग्रह पु. तृ. ए. व.

प्रवक्ष्ये सांगेन प्र+वच् धातु कर्तरि लृट लकार आत्मनेपद उ. पु. ए. व.

आधीच्या श्लोकात श्रीभगवानकृष्णांनी अर्जुनाला सप्त चक्र योगाचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे म्हटले. आपल्या शरीरातील सात महत्त्वाची चक्रांना जागृत केले असता उर्जा प्राप्ती होते. 7 व्या अध्यायातील 29 व्या श्लोकात आपण परमेश्वराच्या निर्गुण निराकार रूपाचा उल्लेख वाचला होता. ह्या श्लोकात अक्षरतत्त्वाचा उल्लेख केला आहे. ॐ हेच ते अक्षर तत्त्व. वेदांमध्ये परमेश्वराला वेगवेगळ्या

नावांनी संबोधले आहे त्यापैकी एक म्हणजे अक्षर. ॐ हे परब्रह्माचे वाचक आहे. केवळ ओंकार उपासनेच्या साह्याने ब्रह्म स्वरूप प्राप्त होऊ शकते. बृहदारण्यक उपनिषद 3.8.8 ह्या मंत्रात गार्गी आणि याज्ञवल्क्य यांच्या संवादात परमेश्वराच्या अक्षर स्वरूपाचे वर्णन आहे. ध्यानधारणा करते वेळी आपण ॐ चा उच्चार करतो. बऱ्याचशा मंत्रांची सुरवात ॐ ने होते. ह्या श्लोकात वेद जाणणारे, ब्रह्मचर्य पाळणारे आणि आसक्ती रहीत अशा निरनिराळ्या व्यक्तींचा उल्लेख आहे. ब्रह्मचर्याचे व्रत म्हणजे सर्व ऐहिक सुखांचा त्याग. आहार विहार यांचे नियमन, अखंड श्रद्धा आणि भक्तीने गुरूसेवा आणि अर्थातच ज्ञान प्राप्तीचा ध्यास. आसक्ती विरहित व्यक्तीचे वर्णन साधारण कसे करता येईल? अनावश्यक गोष्टींचा आपणहोऊन केलेला त्याग आणि त्यायोगे मनाला असलेली शांती. आपोआपच इतरांच्या प्रती निर्माण न होणारी आसूया, राग, द्वेष इत्यादी.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे म्हणत आहेत की

वेद जाणणारे ज्याला अक्षर म्हणतात, आसक्ती रहीत तपस्वी ज्याला जाऊन मिळतात, त्याची इच्छा करणारे ब्रह्मचर्याचे पालन करतात त्या लक्ष्य (बद्दल) तुला सारांशाने सांगेन.

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च। मूध्न्यर्धायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम्।।8.12।।

सर्व-द्वाराणि संयम्य, मनः हृदि च निरुध्य आत्मनः, प्राणम् मूर्ध्नि आधाय, योग-धारणाम् आस्थितः

सर्व-द्वाराणि सर्व-द्वार नपु. द्वि. ब. व.

संयम्य काबूत ठेवून सम+यम् धातु ल्यप प्रत्यय

मनः मनाला मनस् नपु. द्वि. ए. व.

हृदि हृदयात हृद नपु. स. ए. व.

च सुद्धा अव्यय

निरुध्य रोखून नि+रुध् धातु ल्यप प्रत्यय

आत्मनः स्वतःच्या आत्मन् पु. ष. ए. व.

प्राणम् प्राणांना प्राण पु. द्वि. ए. व.

मूर्ध्नि मस्तकात मूर्ध्न नपु. स. ए. व.

आधाय स्थापित करून आङ्:+धा धातु ल्यप प्रत्यय

योग-धारणाम् योग-धारणा स्त्री. द्वि. ए. व.

आस्थितः स्थित होऊन आङ्:+स्था धातु क्त प्रत्यय पु. प्र. ए. व.

शरीराची सर्व द्वारे म्हणजे ज्ञान प्राप्त करणारी आपली इंद्रिये जसे डोळे (रूप), कान (श्रवण), नाक(गंध), जीभ (रस) आणि त्वचा (स्पर्श) यांवर पूर्ण पणे नियंत्रण ठेवायचे आहे. अष्टांग योगातील पाचवे अंग म्हणजे प्रत्याहार, त्याचा उल्लेख ह्या श्लोकात केला आहे.

प्रति+ आहार, इंद्रियांना मिळणाऱ्या आहारापासून विन्मुख करणे म्हणजे प्रत्याहार. जरी ज्ञानेन्द्रियांच्या साह्याने आपल्याला विविध विषयांचे ज्ञान होत असले तरी ती केवळ माध्यमे आहेत. खरे ज्ञान आपल्याला मन आणि बुद्धी च्या साह्याने होते. ह्या श्लोकात सांगितल्या प्रमाणे आपले मन हृदयात असते असे मानायला हरकत नाही. जर सर्व ज्ञानेन्द्रियांवर नियंत्रण करायचे असेल तर मनाला स्थिर करायला हवे. त्यानंतर आपले प्राण उर्ध्व दिशेला नेऊन आधी आज्ञाचक्रात आणि त्यानंतर सहस्त्रार चक्रात स्थापित करायचे आहे. श्रीभगवानकृष्णांनी अर्जुनाला विद्वान माणसे परम लक्ष्य कसे प्राप्त करतात त्याबद्दल सांगायला सुरुवात केली आहे. हे ह्या श्लोकात असे म्हणतात की

सर्व इन्द्रियांना संयमित करून मनाला हृदयात स्थिर ठेवून प्राणाला सहस्रार चक्राकडे आणून तो (विद्वान) योगाभ्यासाची सुरवात करतो.

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्। यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।8.13।।

यः ओम् इति एक-अक्षरम् ब्रह्म व्याहरन् माम् अनुस्मरन्, देहम् त्यजन् प्रयाति, सः परमाम् गतिम् याति।

यः जो यद् पु. प्र. ए. व.

ओम् इति ओम असे

इति अव्यय

एक-अक्षरम् एक-अक्षर नपु. द्वि. ए. व.

ब्रह्म ब्रह्म-तत्व ब्रह्मन् नपु. द्वि. ए. व.

व्याहरन् कथन करणे वि+आ +हृ धातू +शतृ प्रत्यय पु. प्र. ए. व.

माम् मला अस्मद् द्वि. ए. व.

अनुस्मरन् आठवून अनु +स्मृ धातु शतृ प्रत्यय पु. प्र. ए. व.

देहम् देह नपु. द्वि. ए. व.

त्यजन् त्यागून त्यज् धातु शतृ प्रत्यय पु. प्र. ए. व.

प्रयाति जातो प्र +या धातू जाणे कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

सः तो तद् पु. प्र. ए. व.

परमाम् श्रेष्ठ स्थान परमा स्त्री. द्वि. ए. व.

गतिम् गति स्त्री. द्वि. ए. व.

याति पोहोचतो या धातु जाणे कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

आधीच्या श्लोकात योगाभ्यासाची सुरवात करण्यासाठी शरीर आणि मन स्थिर ठेवावे असे सांगितले होते, आता पुढे.

अ-उ-म ही तीन अक्षरे समाविष्ट असलेल्या ओम ह्या पवित्र अक्षराला प्रणव असे म्हणतात. जे परमेश्वराचे निर्गुण निराकार रुपाचे दर्शन घडवतो.

ह्या श्लोकातील व्याहरन् हा शब्द महत्त्वाचा. व्याहरन् व्याहृति म्हणजे सांकेतिक शब्द जे आपल्याला दक्ष रहायला सांगतात, जसे सावधान. तसे वैदिक साहित्यात 7 व्याहृति आहेत. त्यापैकी 3 महाव्याहृति ज्या आपण गायत्री मंत्र म्हणायच्या आधी म्हणतो.

7 व्याहृति खालील प्रमाणे

ॐ भूः - मूलाधार चक्र,

ॐ भुवः - स्वाधिष्ठान चक्र, ॐ स्वः -मणिपुर चक्र,

ॐ महः - अनाहत चक्र,

ॐ जनः - विशुद्धि चक्र,

ॐ तपः - आज्ञा चक्र,

ॐ सत्यम् - सहस्त्रार "तत्सवितुर्वरेण्यं, भर्गो देवस्य धीमहि, धियो योनः प्रचोदयात् |" ऋग्वेदातील 3र्या मंडलातील 62 व्या सूक्तातील 10 वा मंत्र.

ओंकार हे ब्रह्मन् ह्या लक्ष्याचे साधन आहे.

संत ज्ञानेश्वरांनी फार छान वर्णन केले आहे.

तैसें ॐ हें स्मरों सरे । आणि तेथेंचि प्राणु पुरे । मग प्रणवांतीं उरे । पूर्णघन जें ॥ 8.117 ॥

तेव्हा ॐ हे स्मरण्याचे संपून तेथेच प्राणवायु संपतो. मग ॐकार स्मरण्याचे राहिले की जे पूर्णब्रह्म तेच काय ते एक रहाते.

म्हणौनि प्रणवैकनाम । हें एकाक्षर ब्रह्म । जो माझें स्वरूप परम । स्मरतसांता ॥8.118 ॥

म्हणून प्रणव हे एक ज्याचे नाम आहे व जे एकाक्षर ब्रह्म आहे, ते माझे मुख्य स्वरूप असून त्या स्वरूपाचे स्मरण करत असतांना,

यापरी त्यजी देहातें । तो त्रिशुद्धी पावे मातें । जया पावणया परौतें । आणिक पावणें नाहीं ॥ 8.119 ॥

जो अशा स्थितीतच देहत्याग करतो, तो ज्या ब्रह्मप्राप्तीपलिकडे दुसरी काही एक गोष्ट साध्य करण्याची नाही त्या माझ्या स्वरूपाला निश्चयाने पावतो.

श्रीभगवानकृष्ण ह्या श्लोकात असे म्हणतात की अंतिम समयी देह त्याग करत असताना ओम ह्या पवित्र शब्दाचे उच्चारण करत करत जो मला स्मरण करतो त्याला परमगति प्राप्त होते.

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः। तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।8.14।।

हे पार्थ! यः अनन्य-चेताः नित्यशः सततं माम् स्मरति, नित्य-युक्तस्य तस्य योगिनः अहं सुलभः ।

हे पार्थ!

यः जो यद् पु. प्र. ए. व.

अनन्य न अन्यत

अनन्यचेताः अनन्यचेतस् पु. प्र. ए. व.

चेताः मन चेतस् पु. प्र. ए. व.

नित्यशः अव्यय शाश्वत

सततम् अव्यय कायम

माम् मला अस्मद् द्वि. ए. व.

स्मरति स्मरतो स्मृ धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

नित्य-युक्तस्य माझ्यातच रममाण नित्य-युज् धातु क्त प्रत्यय पु. ष. ए. व.

तस्य त्याचा तद् पु. ष. ए. व.

योगिनः योगींचा योगिन् पु. ष. ए. व.

अहम् मी अस्मद् प्र. ए. व.

सुलभः सहज सुलभ पु. प्र. ए. व.

ह्या श्लोकातील अनन्य शब्द महत्त्वाचा आहे. ह्याचा अर्थ न अन्य. म्हणजे इतर कोणीही नाही. असा उल्लेख गीतेच्या इतर श्लोकात पण दिसून येतो. अनन्याश्चिन्तयन्तो मां (9.22), तमेव शरणं गच्छ (18.62), मामेकं शरणं व्रज। (18.66)

अन्याश्रयाणां त्यागोऽनन्यता ।। (नारद भक्ति दर्शन सूत्र-10)

"परमेश्वराच्या आश्रयाशिवाय इतर गोष्टींचा त्याग म्हणजे अनन्य . "

"मामेकमेव शरणमात्मानं सर्वदेहिनाम्।"

श्रीमदभागवतम्-11.12.15

सर्व देहात असलेल्या मलाच शरण यावे.

हया श्लोकातील दुसरे महत्त्वाचे शब्द म्हणजे नित्ययुक्त आणि सतत.

नित्य म्हणजे शाश्वत. बौद्ध तत्वज्ञानाप्रमाणे अनिक्क म्हणजे तत्कालिन.

सुखाचे क्षण आणि दुःख येतात आणि जातात. म्हणजे ते सर्व अनिक्क (अनित्य) आहे. म्हणजेच नित्य शाश्वत आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानात, हेरॅकलिटस(Heraclitus) हया ग्रीक तत्ववेत्त्याने पांटार्ही(panta rhei) म्हणजे सर्व काही वाहून जाते (everything flows) असे सांगितले.

परमेश्वराकडे पोहोचण्याचे वेगवेगळे मार्ग जसे कर्मयोग भक्तियोग ज्ञानयोग.

हया श्लोकात भक्ति मार्गाचा उल्लेख केला आहे.

मराठी विश्वकोशात दिलेल्या माहितीनुसार भक्तीचे वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून वेगवेगळे प्रकार मानण्यात आले आहेत. सगुण भक्ती व निर्गुण भक्ती असे दोन प्रमुख प्रकार होतात. शांत, दास्य, सख्य, वात्सल्य व माधुर्य असे पाच प्रकारही मानण्यात आले आहेत. मनात काहीतरी हेतू बाळगून केली जाणारी ती हैतुकी भक्ती आणि निर्हेतुकपणे केली जाणारी ती अहैतुकी भक्ती होय. हैतुकी ही 'गौणी' व 'अहैतुकी' ही 'मुख्या' वा 'परा' भक्ती मानली जाते. यांपैकी हैतुकीचे सात्त्विकी, राजसी व तामसी असे तीन पोटप्रकारही सांगण्यात आले आहेत. शास्त्रांना अनुसरुन केली जाणारी व गौण असलेली वैधी भक्ती आणि ईश्वरावरील नितान्त प्रेम दर्शविणारी व प्रमुख असलेली रागात्मिका भक्ती, असेही दोन प्रकार आहेत. गौणी भक्ती करणाऱ्या भक्ताचे आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्था असे तीन प्रकार पाडण्यात आले आहेत. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन हे भागवतपुराणाने सांगितलेले भक्तीचे नऊ प्रकार आहेत. या प्रकारांची संख्या नऊ असल्यामुळेच या भक्तीला ' नवविधा ' भक्ती असे नाव रुढ झाले आहे. नारदाने गुणमाहात्म्य, रुप, पूजा, स्मरण, दास्य, सख्य, कांताभाव, वात्सल्य, आत्मनिवेदन, तन्मयता व परमविरह अशा अकरा आसक्तींमध्ये भक्तींचे वर्गीकरण केले आहे.

परमेश्वराचे सतत स्मरण करावे म्हणजे आपल्या प्रत्येक कृतीत परमेश्वर असला पाहिजे असा अर्थ घेता येईल.

हया श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणताहेत की

हे पार्थ!

जो योगी निरंतर भक्तिमधे तल्लीन झाला आहे, जो फक्त माझेच चिंतन करतो त्याला मी सहज प्राप्त होतो.

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्। नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।8.15।।

परमाम् संसिद्धिम् गताः महात्मानः माम् उपेत्य, दुःख-आलयम् अशाश्वतम् पुनः जन्म न आप्नुवन्ति ।

परमाम् श्रेष्ठ परमा स्त्री. द्वि. ए. व.

संसिद्धिम् सिद्धीला संसिद्धि स्त्री. द्वि. ए. व.

गताः प्राप्त गम् धातु क्त प्रत्यय पु. प्र. ब. व.

महात्मानः महान आत्मा महत् आत्मन् पु. प्र. ब. व.

माम् मला अस्मद् द्वि. ए. व.

उपेत्य प्राप्त होऊन उप+इ धातु जाणे ल्यप प्रत्यय

दुःख-आलयम् दुःखाचे घर दुःख-आलय नपु. द्वि. ए. व.

अशाश्वतम् क्षणभंगुर

न शाश्वत नपु. द्वि. ए. व.

पुनः जन्म पुनर्जन्म

पुनः जन्मन् नपु. द्वि. ए. व.

न आप्नुवन्ति प्राप्त होत नाही आप् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

आधीच्या श्लोकात आपण भक्तीयोग आणि भक्तीचे निरनिराळे प्रकार पाहिले. अशा व्यक्तीला ह्या श्लोकात महान आत्मा असे म्हटले आहे. कर्मयोगीने परमेश्वराचे काम समजून निरपेक्ष बुद्धीने आपले आयुष्य खर्ची घालावे. ज्ञानयोगीने ज्ञानाच्या मार्गाने परमेश्वराला शोधावे. श्रीमद्भगवद्गीतेत विशिष्ट

मर्यादेनंतर लोकांची चिंता सोडून आत्मिक उन्नती साधावी असेच म्हटले आहे. पुनर्जन्म ही तशी फार चांगली कल्पना नाही, ह्या श्लोकात तर पुनर्जन्माला दुःखाचे आलय असे म्हटले आहे.

नलिनीदलगतजलमतितरलं

तद्वज्जीवितमतिशयचपलम् । विद्धि व्याध्यभिमानग्रस्तं

लोक शोकहतं च समस्तम्।। भज गोविन्दम् 4 ।।

आपले जीवन कमल-पत्रावर पडलेल्या पाण्याच्या थेंबासारखे आहे

अनिश्चित आणि क्षणभंगुर.

समस्त विश्व रोग, अहंकार आणि दु:खात बुडलेले आहे ॥भज गोविन्दम् 4॥

एकदा परमात्म्याशी भेट झाली की त्यापेक्षा सुखदायी असे काहीच नाही. विद्वानांचे तेच तर अंतिम लक्ष्य आहे.

वरचील देहाची गंवसणी फेडुनी । आहाच अहंकाराचे रज झाडुनी । शुद्ध वासना निवडुनी । आपणपां मेळवीं ॥ ज्ञानेश्वरी 8.135 ॥

आत्म्यावर असणारी देहरूपी गवसणी काढून टाकून, अहंकाररूपी वरवर असणारी धूळ झाडून, शुद्ध वासना वेगळी काढून घेऊन, त्या भक्ताचे मी आपल्याशी ऐक्य करतो. ॥ज्ञानेश्वरी 8.135॥

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे म्हणतात की

परमसिद्धिला प्राप्त झालेले महात्मा, मला प्राप्त केल्यानंतर दुःखाचे आगर असणाऱ्या अशाश्वत असा पुनर्जन्म घेत नाहीत.

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन। मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।।8.16।।

हे अर्जुन! आब्रह्म-भुवनात् लोकाः पुनः-आवर्तिनः; हे कौन्तेय! माम् उपेत्य पुनः जन्म तु न विद्यते।

हे अर्जुन!

आब्रह्म-भुवनात् ब्रहलोकापर्यंत आङ्:+ब्रह्मन्+भुवन् नपु. पं. ए. व.

लोकाः लोक पु. प्र. ब. व.

पुनरावर्तिनः पुनरावर्तिन् पु. प्र. ब. व.

हे कौन्तेय!

माम् अस्मद् द्वि. ए. व.

उपेत्य उप+इ धातु जाणे ल्यप प्रत्यय

पुनःजन्म पुनर्जन्म

पुनःजन्मन् नपु. प्र. ए. व.

तु परन्तु अव्यय

न अव्यय

विद्यते विद् धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ए. व.

पृथ्वी स्वर्ग आणि नरक ह्या कल्पना आपल्याला चांगल्याच माहीत आहेत. ह्याचे पण वेगवेगळे थर आहेत जसे वैदिक ग्रंथांमध्ये पृथ्वी च्या खाली सात लोक, तल, अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल,आणि पाताळ असे वर्णन केले आहे.

पृथ्वीच्या वर सात लोक-भूः, भूवाः, स्वाः, महाः, जनः, तपः, आणि सतयः लोक अस्तित्वात आहेत असे मानले जाते. ह्या सर्वांना 'स्वर्ग' या 'देवलोक' असे म्हणतात.

यहुदी आणि मुस्लिम धर्मात सुद्धा सात स्वर्ग मानले जातात. सातवा आसमान म्हणतात ते हेच.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की

ब्रह्म लोकांपासून सर्वच लोकांचा पुनर्जन्म (पुनरावृत्ती) शक्य आहे पण जे मला प्राप्त करतात त्यांना मात्र मुक्ति मिळते.

सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः। रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः।।8.17।।

ब्रह्मणः यत् सहस्र-युग-पर्यन्तम् अहः युग-सहस्र-अन्ताम् रात्रिम् विदुः ते जनाः अहोरात्र-विदः

ब्रह्मणः ब्रह्मन् नपु. ष. ए. व.

यत् यद् नपु. द्वि. ए. व.

सहस्र-युग-पर्यन्तम् सहस्र-युग-पर्यन्त नपु. द्वि. ए. व.

अहः अहन् नपु. द्वि. ए. व.

युग-सहस्र-अन्ताम् युग-सहस्र-अन्ता स्त्री. द्वि. ए. व.

रात्रिम् रात्रि स्त्री. द्वि. ए. व.

विदुः विद् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब . व.

ते तद् पु. प्र. ब. व.

जनाः जन पु. प्र. ब. व.

अहोरात्र-विदः अहः रात्र विद् पु. प्र. ब. व.

वैदिक गणनेप्रमाणे युगांची मोजणी खाली दिल्याप्रमाणे आहे

कलियुग - 432,000 वर्ष

द्वापरयुग - 8,64,000 वर्ष

त्रेतायुग - 1,296,000 वर्ष

सतयुग - 1,728,000 वर्ष

हया सर्वांचे एक महायुग - 4,320,000 वर्ष.

दिवस आणि रात्रीच्या 24 तासात दिवसा 15 आणि रात्री 15 मुहूर्त, एकूण 30 मुहूर्त असतात. म्हणजेच एक मुहूर्त 48 मिनिटांचा (2 घटीका) असतो.

मुहूर्तचे नाव प्रारंभ समाप्त वेळ

रुद्र	06.00	06.48
आहि	06.48	07.36
मित्र	07.36.	08.24
पितृ	08.24	09.12
वसु	09.12	10.00
वराह	10.00	10.48
विश्वेदेवा	10.48	11.36
विधि	11.36	12.24
सप्तमुखी	12.24	13.12
पुरुहूत	13.12	14.00
वाहिनी	14.00	14.48
नक्तनकरा	14.48	15.36
वरुण	15:36	16:24
अर्यमा	16:24	17:12
भग	17:12	18:00
गिरीश	18:00	18:48
अजपाद	18:48	19:36
अहिर बुध्न्य	19:36	20:24
पुष्य	20:24	21:12
अश्विनी	21:12	22:00
यम	22:00	22:48

अग्नि	22:48	23:36
विधातृ	23:36.	24:24
कण्ड	24:24	01:12
अदिति	01:12	02:00
जीव/अमृत	02:00	02:48
विष्णु	02:48	03:36
युमिगद्युति	3:36	04:24
ब्रह्म	04:24	05:12
समुद्रम.	05:12.	06:00

ह्या श्लोकात श्रीभगवान असे म्हणतात की

ब्रह्माचा एक दिवस एकसहस्र महायुगाचा आणि रात्र सुद्धा तशीच एक सहस्र महायुगाची (कल्प)

ज्यांना ब्रह्माचा दिवस आणि रात्र माहीत आहे त्यांना ब्रह्मा च्या दिवस-रात्री बद्दल माहिती आहे.

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभावन्त्यरागमे। रात्रिगमे प्रलीयन्ते तत्रैवव्यक्तसंज्ञके।।8.18।।

सर्वाः व्यक्तयः अहः आगमे अव्यक्तात् प्रभवन्ति, रात्रि आगमे तत्र अव्यक्त-संज्ञके एव प्रलीयन्ते।

सर्वाः संपूर्ण सर्वा स्त्री. प्र. ब. व.

व्यक्तयः व्यक्त अवस्था व्यक्ति स्त्री. प्र. ब. व.

अहः आगमे ब्रह्माच्या दिवसाची सुरुवात

अहः आगम पु. स. ए. व.

अव्यक्तात् अव्यक्त अवस्था अव्यक्त पु. पं. ए. व.

प्रभवन्ति प्रकट होतात प्र+भू धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

रात्रि-आगमे ब्रह्माच्या रात्री ची सुरवात रात्रि-आगम पु. स. ए. व.

तत्र तेथे अव्यय

अव्यक्त-संज्ञके अव्यक्त म्हणवणारा अव्यक्त-संज्ञक पु. स. ए. व.

एव नक्की अव्यय

प्रलीयन्ते लीन होतात प्र+ली धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ब. व.

ब्रह्मदेवाच्या एका दिवसाला कल्प किंवा सर्ग म्हणतात. म्हणजे एक सहस्र महायुगे. ह्यामधे 14 मन्वन्तरे असतात. चौदा मनूंची नावे पुढिल प्रमाणे - स्वयंभुव, स्वरोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णि, दक्षसावर्णि, ब्रह्मसावर्णि, धर्मसावर्णि, रुद्रसावर्णि, देवसावर्णि आणि इंद्रसावर्णि. सध्या वैवस्वत मन्वन्तर चालू आहे.

साधारण असे म्हणता येईल की ब्रह्मदेव ही केवळ व्यक्ती असे न म्हणता ती एक कालगणना सुद्धा आहे.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

ब्रह्माच्या दिवसाच्या शुभारंभाने सर्व जीव अव्यक्तापासून व्यक्त अवस्थेत प्रकट होतात. आणि रात्र झाल्यावर ते अव्यक्त अवस्थेत लीन होतात.

भूतग्रामः स अवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते। रात्रिगमेऽवशः पार्थ प्रभात्यहरगमे।।8.19।।

हे पार्थ! सः एव अयम् भूत-ग्रामः अवशः भूत्वा भूत्वा रात्रि आगमे प्रलीयते अहः आगमे प्रभवति

हे पार्थ!

सः तो तद् पु. प्र. ए. व.

एव नक्की अव्यय

अयम् हा इदम् पु. प्र. ए. व.

भूत-ग्रामः भूतसमुदाय भूत-ग्राम पु. प्र. ए. व.

अवशः प्रकृति च्या आधीन न वशः पु. प्र. ए. व.

भूत्वा भूत्वा पुन्हा पुन्हा उत्पन्न होऊन भू धातु होणे क्त्वा प्रत्यय

रात्रि आगमे रात्रि आगम पु. स. ए. व.

प्रलीयते लीन होतो प्र+ली धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ए. व.

अहः आगमे अहः आगम पु. स. ए. व.

प्रभवति उत्पन्न होतो प्र+भू धातु होणे कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

आधीच्या आणि ह्या श्लोकात प्रलीयते हा शब्द आला आहे. ह्याचा अर्थ प्रलय. प्रत्येक संस्कृतीमधे प्रलयाच्या कल्पना विषद केलेल्या दिसतात फक्त इजिप्त आणि जपानी संस्कृती ह्याला अपवाद.

प्रलयाच्या कल्पने मागे पुर्ननिर्मिती हा उद्देश असावा. अतिवृष्टी, बर्फ वितळणे, अग्नी, सूर्य, वादळ, हिवाळा इ. कारणांनी प्रलय झाल्याच्या कथा आहेत. आणि तसे घडले सुद्धा आहे.

प्रलयाचे स्वरूप साधारण असे - एखाद्या देवतेच्या (किंवा क्वचित कृष्णसर्पासारख्या दुष्टशक्तीच्या) कोपाने प्रलय होणे, एखाद्या सदाचरणी पुरुषाला पूर्वसूचना मिळाल्याने त्याने नौका, पेटी इ. साधनांचा उपयोग करून प्रलयातून वाचणे, भावी प्रलयाची सूचना देवता वा एखादा प्राणी याजकडून मिळणे, पुनर्निर्मितीसाठी सर्व प्राणिमात्रांची बीजे प्रलयातून वाचणे, प्रलयानंतर वाचलेल्या व्यक्तीने यज्ञ करणे, पुन्हा निर्मिती होणे इ. घटना या जगातील बहुसंख्या प्रलयकथांतून कमीजास्त फरकाने वर्णिलेल्या आढळतात.

जे. जी. फ्रेझरच्या मते प्रलयकथा ऐतिहासिक घटनांवर आधारलेल्या नसून पर्वत, समुद्र, दऱ्या इ. निसर्गघटनांच्या निर्मितीचे स्पष्टीकरण करण्यासाठी तयार झाल्या आहेत. उदा., ड्यूकेलिअनची ग्रीक प्रलयकथा ही थेसलीच्या पर्वतांत निर्माण झालेल्या फटीचे स्पष्टीकरण देण्यासाठी तयार झाली आहे.

द बाइबल' मधे विशाल जल प्रलय अशी कथा आहे , ज्यामध्ये असे वर्णन आहे कि पृथ्वी पाण्यात बुडाली (

हजरत नूह ने एक मोठी नाव आणून सर्व प्राण्यांच्या एक-एक जोड़ी ला वाचवले होते.)

हिन्दू शास्त्रांमध्ये चार प्रकारच्या प्रलयांचे वर्णन आहे नित्य, नैमित्तिक, द्विपार्थ आणि प्राकृत.

1.नित्य प्रलय

वेंदांतानुसार सर्वसाधारण होणारे मृत्यु ला नित्य प्रलय असे नाव आहे जन्म झाला की मृत्यु अटळ ही सर्वमान्य कल्पना आहे.

2.आत्यन्तिक प्रलय: ह्यामध्ये योगीजन आपल्या ज्ञानाच्या सामर्थ्याने ब्रह्मतत्वात विलीन होतात. म्हणजेच त्यांना मोक्ष प्राप्त होतो.

3.नैमित्तिक प्रलय: वेंदांतानुसार प्रत्येक कल्पाच्या शेवटी तीनही लोकांचा क्षय म्हणजे पूर्ण विनाश होतो. ब्रह्माचा एक दिवस समाप्त होतो , त्यावेळी विश्वाचा नाश होतो. हे सर्व आपण विज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तर हिम युग वगैरे शी ह्याचा संबंध जोडता येईल. कारण नैमत्तिक प्रलयकालात अती वृष्टी, वादळे, अती भयंकर सूर्याची उष्णता अशी वर्णने आहेत.

4.प्राकृत प्रलय: ह्यामधे पूर्ण सूर्य मालेचा नाश होणे अपेक्षित आहे. न जल ना वायू ना पृथ्वी,ना आकाश न अग्नि. तिन्ही लोकांचा नाश म्हणजे प्राकृत प्रलय.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

हे पार्थ!

हा तोच जीवांचा समूह आहे जो पुन्हा पुन्हा उत्पन्न होऊन नष्ट होतो. ब्रह्माच्या दिवसाच्या सुरवातीला उत्पन्न होतो आणि ब्रह्माच्या रात्रीबरोबर विलीन होतो.

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः। यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति।।8.20।।

तस्मात् अव्यक्तात् तु परः अन्यः यः सनातनः अव्यक्तः भावः सः सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति।

तस्मात् त्या तद्. पु. पं. ए. व.

अव्यक्तात् अव्यक्ताहून अव्यक्त पु. पं. ए. व.

तु परन्तु अव्यय

परः पलिकडे पर पु. प्र. ए. व.

अन्यः दुसरा अन्य पु. प्र. ए. व.

यः जो यद् पु. प्र. ए. व.

सनातनः शाश्वत सनातन पु. प्र. ए. व.

अव्यक्तः अव्यक्त पु. प्र. ए. व.

भावः भाव पु. प्र. ए. व.

सः तो तद् पु. प्र. ए. व.

सर्वेषु सगळे सर्व पु. स. ब. व.

भूतेषु जीवांचे भूत पु. स. ब. व.

नश्यत्सु नष्ट झाल्यावर नश् धातु शतृ प्रत्यय पु. स. ब. व.

न विनश्यति नष्ट होत नाही वि+नश् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

आधीच्या श्लोकात प्रलयासंबंधी विस्तृत माहिती वाचल्यानंतर अर्थातच मनात प्रश्न येतो, मग बाकी शिल्लक काय उरते? त्याचेच उत्तर पुढे.

व्यक्त आणि अव्यक्त ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू. प्रकृति, आदिमाया अव्यक्त तर त्याचेच सगुण साकार रूप म्हणजे व्यक्त. आकार नाहीसा झाला तर जगाचे जग असणे संपेल पण अव्यक्त तसेच राहिल.

अव्यक्त पेक्षा अलौकिक असे शाश्वत जे सर्वव्यापी, ना आदि ना अंत असे ,अविनाशी मायाशक्ती चा निर्माते असे आहे.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की

हया अव्यक्त पेक्षा सुद्धा अलौकिक शाश्वत सत्य आहे जे सर्व भूतांचा नाश झाल्यावर सुद्धा नष्ट होत नाही.

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम्। यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।8.21।।

अव्यक्तः अक्षरः इति उक्तः, तम् परमाम् गतिम् आहुः, यम् प्राप्य न निवर्तन्ते, तत् धाम परमम् मम

अव्यक्तः अव्यक्त पु. प्र. ए. व.

अक्षरः अक्षर पु. प्र. ए. व.

इति अव्यय

उक्तः वच् धातु क्त प्रत्यय पु. प्र. ए. व.

तम् तद् पु. द्वि. ए. व.

परमाम् परमा स्त्री. द्वि. ए. व.

गतिम् गति स्त्री. द्वि. ए. व.

आहुः ब्रु धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

यम् यद् पु. द्वि. ए. व.

प्राप्य प्र+आप् ल्यप प्रत्यय

न निवर्तन्ते नि+वृत् धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ब. व.

तत् तद् नपु. प्र. ए. व.

धाम धामन् नपु. प्र. ए. व.

परमम् परम नपु. प्र. ए. व.

मम अस्मद् ष. ए. व.

हया श्लोकात परमधाम आणि परमगती असे दोन शब्द वाचायला मिळतात.

वैष्णव पंथानुसार भगवान श्रीकृष्ण हे परब्रह्म आहेत. आणि त्यांचे निवासस्थान गोलोक धाम आहे. ह्यालाच परमधाम असे पण म्हणतात. जसे गोलोक तसे साकेत लोक, (श्रीरामाचे स्थान) वैकुण्ठ लोक, (श्रीविष्णू चे स्थान), शिव लोक, देवी लोक वगैरे.

वैकुण्ठ चा अर्थ कुण्ठ नसलेला. कुण्ठ धातू म्हणजे निष्क्रिय निराश.

परमधाम चे वर्णन गीतेच्या 15 व्या अध्यायातील 6 व्या श्लोकात केले आहे.

न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।

यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥15.6

न सूर्य, चंद्र ना अग्नी माझ्या परमधामाला प्रकाशित करू शकत नाही. येथे पोहोचल्यावर माणूस परत भौतिक जगात परत जात नाही.

परमगती म्हणजे काय?

महतः परमव्यक्तमव्यक्तात्पुरुषः परः ।पुरुषान्न परं किंचित्सा काष्ठा सा परा गतिः।। कठोपनिषद् 1.3.11।।

महानआत्मा च्या पलिकडे अव्यक्त, अव्यक्तापेक्षा श्रेष्ठ पुरुष, आणि पुरुषापेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. हेच परम लक्ष्य आहे.

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

ज्याला अव्यक्त अक्षर असे म्हणतात त्याच शाश्वत अशा स्थानाला परमधाम असे म्हटले जाते आणि ज्यांना हे स्थान प्राप्त होते ते परत येत नाहीत. त्यांना मोक्ष प्राप्त होतो.

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया। यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम्।।8.22।।

हे पार्थ! भूतानि यस्य अन्तः-स्थानि येन इदम् सर्वम् ततम्, सः परः पुरुषः तु अनन्यया भक्त्या लभ्यः।

हे पार्थ!

भूतानि सजीवांचे भूत नपु. प्र. ब. व.

भू धातु क्त प्रत्यय

यस्य ज्याचे यद् पु. ष. ए. व.

अन्तः-स्थानि अंतस्थानी अन्तः-स्थानिन् नपु. प्र. ए. व.

येन ज्याने यद् पु. तृ. ए. व.

इदम् हे इदम् नपु. प्र. ए. व.

सर्वम् सर्व नपु. प्र. ए. व.

ततम् व्याप्त तन् धातु विस्तारणे +क्त प्रत्यय नपु. प्र. ए. व.

सः तो तद् पु. प्र. ए. व.

परः श्रेष्ठ पर पु. प्र. ए. व.

पुरुषः पुरुष पु. प्र. ए. व.

तु परन्तु अव्यय

अनन्यया अन्य कोणत्याही अन+अन्या स्त्री. तृ. ए. व.

भक्त्या भक्तीने भक्ति स्त्री. तृ. ए. व.

लभ्यः लाभदायक लभ् धातु प्राप्त करणे + यत् प्रत्यय पु. प्र. ए. व.

हया श्लोकात अनन्य भक्ती असा उल्लेख केला आहे. असाच उल्लेख 9व्या अध्यायातील 22 व्या श्लोकात सुद्धा सापडतो.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते | तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् || 9.22||

जे सदैव माझेच चिंतन करतात आणि माझ्या भक्तीत तल्लीन असतात त्यांचे मी नेहमीच रक्षण करतो.

7व्या अध्यायातील 16 व्या श्लोकात आपण भक्तांचे चार प्रकार वाचले. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी.

भक्तीचे दोन प्रकार दिसून येतात. स्वतःच्या लाभ करून घेण्यासाठी परमेश्वराला शरण जाणे. आणि दुसऱ्या प्रकाराची भक्ती म्हणजे इतर काहिच मिळवायचे नाही फक्त परमेश्वर प्राप्ती ची अपेक्षा आहे. अनन्य भक्ती म्हणजे फक्त परमेश्वराचेच चिंतन.

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृते: स्वभावात्। करोमि यद् यत् सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि॥ श्रीमद्भागवत 11.2.36

आपापल्या स्वभावानुसार

शरीर, वाणी, मन, इन्द्रिय, बुद्धि आणि शुद्ध चेतना यांच्या साहाय्याने भगवान नारायणाना सर्व काही अर्पित केले पाहिजे.

वेदांमध्ये परमेश्वराला पाने फुले फळे लगडलेल्या झाडाची उपमा दिली आहे. परमेश्वर सर्व-विस्तारीत आहे (Plenary expansions) आपल्या चार भुजांमधे त्यांनी शंख चक्र कमळ आणि गदा धरले ज्यापासून आपल्याला वेगवेगळ्या प्रेरणा मिळतात. त्यांना बऱ्याच नावांनी ओळखले जाते जसे पुरुषोत्तम, त्रिविक्रम, केशव, माधव, अनिरुद्ध, हृषिकेश, संकर्षण, प्रद्युम्न, श्रीधर, वासुदेव, दामोदर, जनार्दन, नारायण, वामन, पद्मनाभ वगैरे.

कोणी अष्टांग योगाभ्यास करेल, कोणी तपस्या किंवा ज्ञानमार्गाचा अवलंब करेल, विरक्त आयुष्य जगेल पण भक्ती शिवाय परमेश्वर प्राप्त होणार नाही. ह्या श्लोकात भक्तिमार्गाचे महत्व सांगितले आहे.

भक्त्याहमेकया ग्राह्यः श्रद्धयाऽऽत्मा प्रियः सताम्।

श्रीमद्भागवतम्-11.14.21

मी फक्त त्या भक्तांना प्राप्त होतो जे श्रद्धा आणि प्रेमपूर्वक माझी भक्ती करतात.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की

हे पार्थ! ज्या परम पुरुषात समस्त जीव वास करतात आणि जो सर्व व्यापी आहे त्या श्रेष्ठ पुरुषाची अनन्य भक्ती करून त्याला प्राप्त करून घेता येते.

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः। प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ।।8.23।।

हे भरतर्षभ! यत्र काले तु प्रयाताः योगिनः अनावृत्तिम् आवृत्तिम् च एव यान्ति, तम् कालम् वक्ष्यामि।

हे भरतर्षभ!

यत्र जेथे अव्यय

काले वेळी काल पु. स. ए. व.

तु परन्तु अव्यय

प्रयाताः शरीर त्यागून गेलेले प्रयात पु. प्र. ब. व.

योगिनः योगी योगिन् पु. प्र. ब. व.

अनावृत्तिम् परतून न येता न+आवृत्ति स्त्री. द्वि. ए. व.

आवृत्तिम् परतून येता आवृत्ति स्त्री. द्वि. ए. व.

च सुद्धा अव्यय

एव सुद्धा अव्यय

यान्ति प्राप्त होतात या धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

तम् तो तद् पु. द्वि. ए. व.

कालम् मार्ग काल पु. द्वि. ए. व.

वक्ष्यामि वर्णन करून सांगतो वच् धातु कर्तरि लृट लकार परस्मैपद उ. पु. ए. व.

दुसऱ्या श्लोकात अर्जुनाने श्रीभगवानकृष्णांना विचारलेला प्रश्न संयमी पुरुषाने अंतिम समयी तुला कसे ओळखावे? याचे उत्तर.

आपल्या नेहमीच्या वापरातील शब्द आवृत्ती काढणे म्हणजे पुनःनिर्मिती ह्याचा चपखल उपयोग ह्या श्लोकात केला आहे. आतापर्यंतच्या श्लोकात भक्तिमार्गाचे विवेचन केले होते. आधीच्या श्लोकात अनन्य भक्तीने परमात्म्याला प्राप्त करून घेता येते असे सांगून झाल्यावर आता प्रश्न आहे, त्यांचा जे अनन्य भक्ती करत नाहीत, म्हणजेच ह्या श्लोकातील योगी ह्या शब्दाचा अर्थ कर्मयोगी, ज्ञानयोगी आणि हठयोगी यांच्या बद्दल श्रीभगवानकृष्ण अर्जुनाला असे सांगत आहेत की

हे भरतर्षभ! ज्या वेळी शरीरत्याग करून गेलेले योगी परत न येणाऱ्या गतीला आणि परत येणाऱ्या गतीला प्राप्त होतात तो मार्ग मी सांगतो.

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम्। तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः।।8.24।।

अग्निः, ज्योतिः, अहः, शुक्लः षण्मासाः उत्तर-अयनम्, तत्र प्रयाताः ब्रह्मविदः जनाः ब्रह्म गच्छन्ति।

अग्निः अग्नि पु. प्र. ए. व.

ज्योतिः प्रकाश ज्योतिस् नपु. प्र. ए. व.

अहः दिवस अहन् नपु. प्र. ए. व.

शुक्लः शुक्लपक्ष शुक्ल पु. प्र. ए. व.

षण्मासाः सहा महिने षष् मास पु. प्र. ब. व.

उत्तर-अयणम्, उत्तरायण नपु. प्र. ए. व.

तत्र तेथे अव्यय

प्रयाताः देह त्यागणारे प्रयात पु. प्र. ब. व.

ब्रह्मविदः ब्रह्माला जाणणारे ब्रह्मन् विद पु. प्र. ब. व.

जनाः लोक जन पु. प्र. ब. व.

ब्रह्म ब्रह्माला ब्रह्मन् नपु. द्वि . ए. व.

गच्छन्ति जातात गम् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ब. व.

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम्। तत्र चन्द्रमसं ज्योतिर्योगि प्राप्य निवर्तते।।8.25।।

धूमः, रात्रिः, तथा कृष्णः षण्मासाः दक्षिण-अयनम्, तत्र योगी चंद्रमासमः ज्योतिः प्राप्य निवर्तते।

धूमः धूम्र धूम पु. प्र. ए. व.

रात्रिः रात्रि स्त्री. प्र. ए. व.

तथा तसे अव्यय

कृष्णः कृष्णपक्ष कृष्ण पु. प्र. ए. व.

षण्मासाः सहा महिने षष् मास पु. प्र. ब. व.

दक्षिण-अयनम् दक्षिणायन नपु. प्र. ए. व.

तत्र तेथे अव्यय

योगी योगिन् पु. प्र. ए. व.

चंद्रमासम् चंद्रमास नपु. द्वि. ए. व.

ज्योतिः प्रकाश ज्योतिस् नपु. द्वि. ए. व.

प्राप्य प्राप्त होऊन प्र+आप् धातु ल्यप प्रत्यय

निवर्तते परत येतो नि+वृत् धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ए. व.

भारतीय तत्त्वज्ञानात ज्ञान म्हणजे प्रकाश. आणि अज्ञान म्हणजे अंधकार अशी शब्दरचना केलेली असते. अग्नि, प्रकाश, दिवस, चन्द्रकलेचा शुक्ल पक्ष आणि सूर्याच्या उत्तरायणाचे सहा महिने हे सर्व प्रकाशाची द्योतके आहेत.

23 व्या अध्यायात सूतोवाच केल्याप्रमाणे श्रीभगवानकृष्ण आता त्या दोन मार्गांविषयी माहिती देत आहेत.

हया दोन श्लोकांत केलेले वर्णन छान्दोग्योपनिषद् मध्ये पण वाचता येते.

तद्य इत्थं विदुः। ये चेमेऽरण्ये श्रद्धा तप इत्युपासते तेऽर्चिषमभिसंभवन्त्यर्चिषोऽहरह्न आपूर्यमाणपक्षमापूर्यमाणपक्षाद्यान्षडुदङ्डेति मासांस्तान् ॥ छान्दोग्योपनिषद् 5.10.1॥

मासेभ्यः संवत्सरं संवत्सरादादित्यमादित्याच्चन्द्रमसं चन्द्रमसो विद्युतं तत्पुरुषोऽमानवः स एनान्ब्रह्म गमयत्येष देवयानः पन्था इति ॥ छान्दोग्योपनिषद् 5.10.2॥.

ज्यांना हे माहित आहे आणि जे जंगलात राहतात आणि भक्तीने तपस्या करतात, ते मृत्यूनंतर तेजस्वी जगात जातात. प्रकाशाच्या जगातून ते दिवसाच्या जगात जातात; दिवसाच्या जगातून ते शुक्ल पक्षातील जगात जातात; त्यानंतर सहा महिन्याचे उत्तरायण. वर्षानुवर्षे ते सूर्याकडे जातात; सूर्यापासून ते चंद्राकडे जातात; आणि चंद्रापासून ते विजेकडे जातात. तिथे कोणीही मानव नाही, तो त्यांना स्वीकारतो आणि ब्रह्मलोकात घेऊन जातो. हा देवांचा मार्ग आहे.

24 व्या अध्यायात ते असे म्हणतात की

जेव्हा सूर्य 6 महिने पृथ्वीच्या ऊत्तरेला झुकलेला आहे, दिवसाचा काळ मोठा आहे आणि शुक्ल पक्षात चंद्राचा प्रकाश आहे जेथे अग्नी देवतेचा प्रभाव आहे अशा काळात जे देहाचा त्याग करतात, जे ब्रह्म तत्त्व जाणतात त्यांना ब्रह्मा ची प्राप्ती होते.

25 व्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की दक्षिणायन स्थिति मधे जेव्हा रात्री चा काळ मोठा होतो, चंद्राचा प्रकाश कृष्ण पक्षात कमी कमी होत जातो, रात्र धूसर होत जाते अशा वेळी जर योग्याने देहत्याग केला तर तो स्वर्गात पोहोचतो, (तेथे सुख उपभोगतो) आणि काही काळानंतर त्याचा पुनर्जन्म होतो.

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते। एकया यात्यनावृत्तिमन्ययाऽऽवर्तते पुनः।।8.26।।

हि जगतः एते शुक्ल-कृष्णे गती शाश्वते मते। एकया अनावृत्तिम् याति अन्यया पुनः आवर्तते।

हि कारण अव्यय

जगतः जगाचे जगत् नपु. ष. ए. व.

एते हे दोन एतद् नपु. द्वि. द्वि. व.

शुक्ल-कृष्णे शुक्ल आणि कृष्ण

शुक्ल-कृष्ण स्त्री. प्र. द्वि. व.

गती मार्ग गति स्त्री. प्र.द्वि. व.

शाश्वते शाश्वत नपु. प्र. द्वि.व.

मते मत नपु. प्र. द्वि.व.

एकया एका स्त्री. तृ. ए. व.

अनावृत्तिम् (मुक्ती)पुनरावृत्ती नाही

न आवृत्ति स्त्री. द्वि. ए. व.

याति जातो या धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

अन्यया दुसऱ्या (मार्गाने) अन्या स्त्री. तृ. ए. व.

पुनः अव्यय

आवर्तते परत येतात आङ्ः+वृत् धातु कर्तरि लट् लकार आत्मनेपद प्र. पु. ए. व.

आधीच्या दोन श्लोकात आपण उत्तरायण आणि दक्षिणायन यासंबंधी वाचले.

अग्नी ची विविध रूपे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे उपयोगी ठरतात. जसे जठराग्नी. अग्नी म्हणजे ऊर्जा. जे अर्चिरादि मार्ग अवलंबतात ते त्या देवतेस प्राप्त होतात. अर्चिः म्हणजे प्रकाश. अर्चि पासून अग्नी, अग्नी पासून ज्योती, ज्योती पासून शुक्ल पक्ष आणि त्यापासून उत्तरायण, संवत्सर. ह्याला देवयान मार्ग असे म्हणतात ज्याचा अवलंब करणारे, ब्रह्म जाणणारे असे मुक्ती मिळवतात. त्याच्या उलट पितृयान मार्ग जो धूसर, अंधारमय आणि पुनर्जन्म प्राप्त करून देतो. मात्र संत ज्ञानेश्वर ह्याला आपले प्रारब्ध असे म्हणतात.

आतां असो हें सकळ । जाण पां ज्ञानासि अग्नि मूळ ।

तया अग्नीचें प्रयाणीं बळ । संपूर्ण आथी ॥8.219 ॥

आता हे सगळे असे समजा की ज्ञानाचे मूळ कारण अग्नि आहे. तो अग्नी मरणाकाळी पूर्ण ऊर्जावान असावा. ॥8.219 ॥

तंव एकें ब्रह्मत्वा जाइजे । आणि एकें पुनरावृत्ती येइजे ।परि दैवगत्या जो लाहिजे । देहांतीं जेणें ॥8.246 ॥

तर एका मार्गाने ब्रह्मत्वास जाता येते. आणि एकाने पुनर्जन्माला येणे होते. हे सर्व प्रारब्धानेच होते ॥8.246॥

ह्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ असा की

जे शुक्ल पक्षात सद्गति प्राप्त करतात त्यांना मुक्ती मिळते, जे कृष्ण पक्षात देहत्याग करतात त्यांचे पुनरागमन होते.

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन। तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।।8.27।।

हे पार्थ! एते सृती जानन् कश्चन योगी न मुह्यति; तस्मात् हे अर्जुन! सर्वेषु कालेषु योग-युक्तः भव।

हे पार्थ!

एते ह्या एतद् स्त्री. द्वि. द्वि. व.

सृती दोनही मार्गांना सृति स्त्री. द्वि. द्वि. व.

सृ धातु सरकणे, पुढे जाणे

जानन् जाणून घेत असता ज्ञा धातु शतृ प्रत्यय पु. प्र. ए. व.

कश्चन किञ्चन पु. प्र. ए. व.

योगी योगिन् पु. प्र. ए. व.

न मुह्यति; मोह होत नाही मुह् धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

तस्मात् तद् पु. पं. ए. व.

हे अर्जुन!

सर्वेषु सर्व पु. स. ब. व.

कालेषु काल पु. स. ब. व.

योग-युक्तः योग+युज् धातु क्त प्रत्यय पु. प्र. ए. व.

भव होऊदे भू धातु कर्तरि लोट लकार परस्मैपद म. पु. ए. व.

आतापर्यंतच्या 4 श्लोकात दोन प्रकारच्या मार्गांचे विवेचन केले आहे. श्रेयस मार्ग अंतःकरण शुद्ध करून क्रमाने मोक्षप्राप्ती करून देणारा आहे. याउलट प्रेयस मार्ग जीवाला कर्मामधे प्रवृत्त करून आसक्ती निर्माण करणारा आहे. दोन्ही मार्गांची ज्याला यथायोग्य माहिती आहे असा योगी जो आपल्या मार्गाने जाताना विचलित होत नाही.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे म्हणतात की

हे पार्थ! ज्या योगींना हे दोन मार्ग माहीत आहेत ते कधीच कसल्या मोहात पडत नाहीत म्हणून हे अर्जुन! तू सुद्धा सर्व काळ अशीच योगाची साधना कर.

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्। अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा

योगी परं स्थानमुपैति चाद्यम्।।8.28।।

योगी इदम् विदित्वा, वेदेषु यज्ञेषु तपःसु दानेषु च एव यत् पुण्य-फलम् प्रदिष्टम्, तत् सर्वम् एव अत्येति, आद्यम् च परम् स्थानम् उपैति।

योगी योगिन् पु. प्र. ए. व.

इदम् हे इदम् नपु. द्वि. ए. व.

विदित्वा जाणल्यावर विद् धातु क्त्वा प्रत्यय

वेदेषु वेदांचे वेद पुं. स. ब. व.

यज्ञेषु यज्ञाचे यज्ञ पुं. स. ब. व.

तपःसु तपांचे तपस् नपुं स. ब. व.

दानेषु दानाचे दान नपुं. स. ब. व.

च आणि अव्यय

यत् जे यद् नपु. द्वि. ए. व.

पुण्य-फलम् पुण्याचे फळ पुण्य-फल नपुं. द्वि. ए. व.

प्रदिष्टम् सांगितले आहे प्र+दिष् धातु क्त प्रत्यय नपु. द्वि. ए. व.

तत् ते तद् नपु. द्वि. ए. व.

सर्वम् सर्व नपु. द्वि. ए. व.

एव नक्की अव्यय

अत्येति मागे टाकते अति+इ धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

आद्यम् मूळ आद्य नपु. द्वि. ए. व.

च आणि अव्यय

परम् श्रेष्ठ पर नपु. द्वि. ए. व.

स्थानम् स्थान नपु. द्वि. ए. व.

उपैति प्राप्त करतो उप+इ धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.

श्रीभगवानकृष्णांनी आधीच्या श्लोकात अर्जुनाला योगाची साधना करण्यास तर सांगितले, खऱ्या योगी ची लक्षणे गीतेतील 6 व्या अध्यायातील 18, 19 श्लोकात आधीच सांगून झाली आहेत. आता त्यापुढे जाऊन श्रीभगवान असे म्हणतात की

ह्या श्लोकात परमपद कसे प्राप्त होते यावर भाष्य केले आहे. श्रीमद्भगवद्गीतेच्या 18 व्या अध्यायाचे नाव मोक्ष संन्यास योग असे आहे. ते वाचून आपल्या मोक्षाच्या कल्पना आणखी स्पष्ट होतात.

ह्या श्लोकात पुण्य कर्मांची वैशिष्ट्ये सांगितली आहेत जी केली असता त्याची फळे मिळतात. ती पुढिल प्रमाणे

1. वेदांचे पठण

2. श्रद्धापूर्वक केलेल्या यज्ञाचे पुण्य

3. निग्रहाने केलेले तप

4. दानधर्म

मात्र ह्या पुण्यकर्माच्या पलिकडे जो जातो त्याला परमपद प्राप्त होते.

मृत्यू समयी जो भाव मनात असेल त्या प्रमाणे पुनर्जन्म मिळणार हे भगवंतांनी 6व्या श्लोकात सांगितले होते. 11,12 आणि 13 व्या श्लोकात ब्रह्मचर्याचे पालन ॐकाराची उपासना केल्याने परमगती प्राप्त होते असे म्हटले होते.

ह्या श्लोकात श्रीभगवानकृष्ण असे सांगत आहेत की

जो योगी ज्ञानमार्ग, वेदाध्ययन, तपस्या, दानधर्म (कर्मयोग) ह्या सर्वांमुळे मिळणारे पुण्य ह्या सर्व गोष्टींची माहिती असणारा असा त्या सर्वांच्या पलिकडे जाऊन परमेश्वराशी एकरुप होतो (निस्सीम भक्ति) त्याला त्या सर्वोच्च स्थानाची प्राप्ती होते.

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो नाम पत्र

अष्टोऽध्यायः । हरिः ॐ तत् सत् ।।

याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद् व ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र याविषयी श्रीभगवानकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील अक्षरब्रह्म योग नावाचा आठवा अध्याय पूर्ण झाला.

----------🙏🙏🙏🙏🙏----------